उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे इंग्रजी संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी कार्यक्रम निर्मिती व त्याची परिणामकारकता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेंतर्गत
शिक्षणशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीच्या अंशत:
पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

काळखैरे अंकुश नामदेव

मार्गदर्शक

डॉ. पुंडगे मधुकर अंबाजी

(M.A., M.Ed.,Ph.D.)

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मे २०१९

प्रस्तावना :

आजच्या आधुनिक युगात विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरासाठी इंग्रजी भाषा आवश्यक आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा असल्याने इंग्रजीचे सर्व क्षेत्रात महत्त्व आहे. इंग्रजीचा सर्व क्षेत्रात वापर केला जात असल्याने प्रत्येकाला इंग्रजी भाषा अवगत असणे आवश्यक आहे. इंग्रजीला जागतिक स्तरावर महत्त्व असल्याने 'Nelson Mandela' आणि 'Johanna Wolfgang' यांनी इंग्रजीचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

"Those who know nothing of foreign language know nothing of their own"

आजच्या जगात इंग्रजीचा वापर माहिती तंत्रज्ञान, वैद्यकिय, शिक्षण, व्यापार, बँका, विविध सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात केला जात आहे. इंग्रजीचा वापर जरी सर्व क्षेत्रात केला जात असला तरी समाजातील प्रत्येक घटकाला मातृभाषेचे वैयक्तिक, सामाजिक महत्त्व अबाधीत ठेवणे आवश्यक आहे. भाषा हेच आपले भविष्य घडविण्याचे उत्तम साधन होऊ शकते. कोणतीही कला आपोआप तयार होत नाही, त्यासाठी लहान वयातच मुलांशी विविध व्यावसायिक संधीविषयी बोलायला हवे. भाषा अध्ययनातून मला आयुष्यात काय बनायचे आहे याचे स्वप्न विद्यार्थी रंगवू शकतील आणि ते सत्यात आणण्यासाठी धडपडू लागतील. भाषेच्या अध्ययनातून अनेक क्षेत्रात विद्यार्थी प्रगती करतील त्यामुळे इंग्रजी भाषेबरोबर मराठी भाषेलाही महत्त्व देणे आवश्यक आहे. भाषा हे संप्रेषण प्राथमिक साधन आहे.

आजच्या युगात देशाची प्रगती करावयाची असेल तर वेगवेगळ्या क्षेत्रात संशोधन करणे आवश्यक आहे. आज माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, सामाजिक या क्षेत्रांत नवनवीन बदल होत आहेत या नवीन बदलांचा स्वीकार करण्यासाठी इंग्रजी भाषा आवश्यक आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व संशोधन क्षेत्रात काम करण्यासाठी इंगजी भाषा अवगत असणे आवश्यक आहे.

इंग्रजी भाषेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय संबंध, चर्चा, विचारविनिमय करता येणे शक्य झाले आहे. महाविद्यालयीन, विद्यापीठीय संशोधन संस्थेतील अभ्यास देखील इंग्रजीतून होत आहे. आपल्या दैनंदीन जीवनात इंग्रजी भाषा आवश्यक आहे.

इंग्रजी भाषेचे महत्त्व Oliver Wendell Holem या लेखकांनी पुढीलप्रमाणे सांगीतले आहे.

"English language is the blood of the soul in to which thoughts run and out of which they grow."

आपल्या जीवनातील इंग्रजीचे महत्त्व :

दैनंदिन जीवनात इंग्रजीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आधुनीक युगात इंग्रजीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. इंग्रजीचा हिंदी आणि प्रादेशिक भाषेप्रमाणे मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे.

शिक्षण क्षेत्रामध्ये प्रामुख्याने इंग्रजीचा वापर केला जात आहे. इंग्रजी भाषा ही कार्यालयीन संप्रेषणासाठी मोठ्या प्रमाणात वापरली जाते. शाळेमध्ये सूचना देण्यासाठी प्रमुख भाषा म्हणून वापर केला जात आहे. विद्यार्थ्यांना जर परदेशात शिक्षण घेण्यासाठी जायचे असेल, तर त्यांना इंग्रजी विषय चांगला अवगत असणे आवश्यक आहे. राज्याराज्यामध्ये अंतर्गत संप्रेषण साधणेसाठी इंग्रजी भाषा आवश्यक आहे. अनेक देशामध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकणेसाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी इंग्रजी ही द्वितीय भाषा शिक्षणासाठी वापरली जाते. इंग्रजी भाषेबरोबर संप्रेषण कौशल्यालाही महत्त्व आहे. कारण इंग्रजी भाषेला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झालेला आहे.

संप्रेषण हे विचार व्यक्त करणारे प्रभावी साधन आहे. संप्रेषण करणेसाठी प्रामुख्याने मातृभाषेचाच वापर केला जात असला तरी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रामुख्याने उद्योग, सेवा, माहिती तंत्रज्ञान, बँकींग, आयात-निर्यात या क्षेत्रांमध्ये इंग्रजीचा वापर केला जातो. विचारांच्या माहितींची देवाणघेवाण करण्याची क्रिया म्हणजे संप्रेषण होय. संप्रेषण कौशल्य चांगले असेल तरच त्या कौशल्याद्वारे आपण दुसऱ्या व्यक्तिशी चांगल्या प्रकारे सुसंवाद करु शकतो. विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी संप्रेषण कौशल्याची आवश्यकता आहे. प्रत्येक व्यक्तीला आजच्या स्पर्धायुक्त युगात टिकण्यासाठी इंग्रजी संप्रेषण कौशल्य आवश्यक आहे.

इंग्रजी ही आपली मातृभाषा नसल्याने दुसऱ्या व्यक्तींशी संवाद साधताना आपले विचार, भावना, मत दुसऱ्यापर्यंत पोहचविताना अडचणी येतात. आजच्या युगात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर माहिती तंत्रज्ञान, संशोधन, व्यापार, आरोग्य या क्षेत्रात प्रगती करावयाची असेल तर प्रथम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संप्रेषण कौशल्यावर भर देणे आवश्यक आहे. कारण ग्रामीण भागातील विद्यार्थी आजच्या स्पर्धायुक्त युगात आजच्या काळात स्पर्धेत टिकण्यासाठी संप्रेषण कौशल्य आवश्यक आहे. संशोधकाला माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून काम करीत असताना आलेल्या स्वअनुभवामुळे तसेच इंग्रजी विषयाच्या पाठ निरीक्षणावरुन निदर्शनास आले आहे की, ग्रामीण भागातील

माध्यमिक शाळेत केवळ विद्यार्थी उत्तीर्ण होईल या दृष्टीने वाचन, लेखन, पाठांतर या कौशल्यावर भर दिला जातो.

विद्यार्थ्यांचे संप्रेषण कौशल्य सुधारण्यासाठी संशोधकाच्या पुर्वानूभवाने माध्यमिक स्तरावर अधिक प्रयत्न करणे आवश्यक वाटते. संप्रेषण कौशल्य सुधारणेसाठी शाळेमध्ये खास कृतीकार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे संप्रेषण कौशल्य सुधारले की नाही याचा विचारसुद्धा केला जाणे आवश्यक आहे. अलीकडे नवीन मूल्यमान पद्धतीमध्ये तोंडी परीक्षेचे तंत्र वापरले जात आहे. परंतू विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित बदल झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून संशोधकाने भाषण- संप्रेषण कौशल्यांवर संशोधन करावयाचे ठरविले आहे.

ग्रामीण भागात लेखन, वाचन व पाठांतर या कौशल्यावर प्रामुख्याने भर दिला जातो परंतू भाषण- संप्रेषण या कौशल्यावर भर दिला जावा म्हणून संशोधकाला माध्यमिक शाळेत इंग्रजी विषयाचे अध्यापनाचे काम करताना विद्यार्थ्यांची वाचन, श्रवण, लेखन, याबरोबरच संप्रेषण कौशल्यही विकसित करावयाची आहेत. विद्यार्थ्यांचे संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी इंग्रजी मधील आशय, शब्दसंग्रह वाढ, उच्चार योग्य ओघवती भाषा, भाषेचे प्रभुत्व, चेहऱ्यावरील योग्य हावभाव, व्याकरणाचा योग्य वापर, शब्दावर योग्य ठिकाणी आघात इत्यादी भाषेचे कौशल्य विकसित करण्यासाठी स्व माहिती, गटचर्चा, मुलाखत व प्रश्नोत्तरे या संप्रेषण कौशल्याच्या साधनाद्वारे संप्रेषण कौशल्य वृद्धींगत करुन संप्रेषणामध्ये गतिमानता आणणे हे संशोधकाला फार महत्त्वाचे वाटते. विद्यार्थ्यांना गटचर्चा, मुलाखत, प्रश्नोत्तरे, आपली मते, विचार दुसऱ्यापर्यंत पोहचविताना अडचणी येत असल्याचे संशोधकाच्या निदर्शनास येत आहे. संशोधकाला इंग्रजी विषयाचे अध्यापन करताना नवनवीन तंत्रे, कृति कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांचे संप्रेषण कौशल्य सुधारणे आवश्यक वाटते. संशोधकाला उच्च प्राथमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करताना वाचन, लेखन, या कौशल्याबरोबर संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी व त्यासाठी कृतिकार्यक्रम राबविणेसाठी संशोधकाने संशोधनासाठी इयत्ता ८ वी च्या वर्गातील शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे इंग्रजी संप्रेषण -कौशल्य विकसित करण्यासाठी कार्यक्रम निर्मिती व त्याची परिणामकारकता हा विषय निवडला आहे.

संशोधनाची गरज :

इंग्रजी ही जागतिक भाषा असल्याने विद्यार्थ्यांना अध्ययन करताना अडचणी येतात. प्रामुख्याने वाचन, श्रवण, भाषण–संभाषण ही भाषिक कौशल्य प्राप्त करणेसाठी संप्रेषण कौशल्य आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना संप्रेषण करताना अडचणी आल्यास विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होतो. विद्यार्थ्यांना संप्रेषण कौशल्य अवगत नसल्याने शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना आनंद घेता येत नाही. इंग्रजी विषयाची भीती विद्यार्थ्यांना वाटते. म्हणून संशोधनाची गरज आहे.

संशोधनाचे महत्त्व :

कोणतीही भाषा शिकताना श्रवण, संप्रेषण व लेखन या क्रमाने अध्ययन घडते. आपले विचार व्यक्त करण्यासाठी संप्रेषण कौशल्य चांगले आत्मसात व्हावे व त्याचे दोष शोधून उपाय सुचविणेसाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने संशोधनाचे महत्त्व :

१. सदर संशोधनाचा उपयोग विद्यार्थ्यांचे संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी होईल.
२. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची गोडी निर्माण होईल.
३. विद्यार्थ्यांना आपली मते प्रभावीपणे मांडता येतील.

समाजाच्या दृष्टीने संशोधनाचे महत्त्व :

१. सदर संशोधनामुळे शिक्षणक्षेत्रात इंग्रजी बाबतची क्लिष्टता व भीती दूर होऊन प्रेरणा मिळेल.
२. इंग्रजी संप्रेषणाचे महत्त्व समाजापर्यंत पोहचविता येईल.

संशोधन समस्येचे विधान :

उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे इंग्रजी संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी कार्यक्रम निर्मिती व त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

संकल्पनात्मक व कार्यात्मक व्याख्या :

संकल्पनात्मक व्याख्या :

१. इयत्ता ८ वी चा वर्गः

प्राथमिक शिक्षणातील अंतिम वर्ग (टप्पा) म्हणजे इयत्ता ८ वी होय. (संदर्भ : बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क, अधिनियम २००९, दि. १.४.२०१० ची मार्गदर्शिका)

२. संप्रेषण कौशल्य विकसन (Development of Communication Skill)

The art & Science of human communication linked to a society's planned transformation from of state of poverty to one dynamic socioeconomic growth that makes for grater equality and the larger unfolding of individual potential's (Ref.:www.clasroom-management-successes.org / teacher-studentcommunication. html/#hash.dpuf)

३. कार्यक्रम निर्मिती (Programme Activity)

Measurable amount of work performed to convert input's into output's (Ref. : www.clasroom-management-successes.org / teacher-studentcommunication. html/# hash. dpuf)

४. परिणामकारकता (Effectiveness)

Effectiveness is the capability of producing a desired result or the ability to produce desired output when something is deemed effective it mean's it has intended or expected outcome or produces a deep vivid impression. (Reference : www.clasroom-management-successes.org / teacher-student communication. html/#hash.dpuf)

कार्यात्मक व्याख्या :

१. उच्च प्राथमिक स्तर :

विद्यार्थ्यांना इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंत शिक्षण देण्याची व्यवस्था म्हणजे उच्च प्राथमिक स्तर होय.

२. संप्रेषण कौशल्य विकसन :

इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना एखादा प्रसंग, स्वपरिचय, गट चर्चा, मुलाखत व प्रश्नोत्तरे या विषयी आपले विचार, भावना इंग्रजी भाषेतून प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्य क्षमता होय.

३. कार्यक्रम निर्मिती :

इंग्रजी संप्रेषण कौशल्याविषयी माहिती, तज्ञांचे मार्गदर्शन Picture Reading, Loud Reading, Look & Say, Echo Dialogues, Answering Questions, Say a word to complete the sentence, Just Repeat, Tell the English word you know, Describing a Picture, Group Discussion & Delivering a Speech या कृती कार्यक्रमांचा समावेश करुन तयार केलेल्या मर्यादित कालावधीसाठी उद्दिष्टानुसार कार्यक्रम म्हणजे कार्यक्रम निर्मिती होय.

४. परिणामकारकता :

पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी परिक्षेतील गुणांमधील सकारात्मक फरक म्हणजे परिणामकारकता होय.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संप्रेषण कौशल्यातील अडचणींचा शोध घेणे.
२. इंग्रजी संप्रेषण कौशल्य विकसनासाठी कृति कार्यक्रम निर्मिती करून त्यांची अंमलबजावणी करणे.
३. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संप्रेषण कौशल्याची तुलना करणे.
४. इंग्रजी संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी राबविलेल्या कृतिकार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे.

संशोधनाची गृहीतके :

१. विद्यार्थ्यांच्या संप्रेषण कौशल्यात अडचणी आहेत.
(संदर्भ : लोखंडे तेजस्विनी वसंत, (२००९) पुणे विद्यापीठ, प्राथमिक शाळेतील इंग्रजी विषयाच्या संप्रेषण कौशल्य विकसनातील समस्या निवारणासाठीच्या उपचारात्मक अध्यापनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास – एम. फिल स्तरावरील संशोधन)
२. विद्यार्थ्यांचा नियोजनपूर्वक संप्रेषण कौशल्यांचा सराव घेतल्यास संप्रेषण कौशल्य विकसित होते.

(संदर्भ : लोखंडे तेजस्विनी वसंत, (२००९) पुणे विद्यापीठ, प्राथमिक शाळेतील इंग्रजी विषयाच्या संप्रेषण कौशल्य विकसनातील समस्या निवारणासाठीच्या उपचारात्मक अध्यापनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास - एम. फिल स्तरावरील संशोधन)

३. शैक्षणिक वातावरण निर्मिती व कृति कार्यक्रम घेतल्यास विद्यार्थ्यांचे संप्रेषण कौशल्य सुधारणेस मदत होते.

(संदर्भ : लोखंडे तेजस्विनी वसंत, (२००९) पुणे विद्यापीठ, प्राथमिक शाळेतील इंग्रजी विषयाच्या संप्रेषण कौशल्य विकसनातील समस्या निवारणासाठीच्या उपचारात्मक अध्यापनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास - एम. फिल स्तरावरील संशोधन)

संशोधन परिकल्पना :

इंग्रजी संप्रेषण -कौशल्य विकसनासाठी स्वपरिचय, गटचर्चा, मुलाखत, प्रश्नोत्तरे या साधनासाठी कृतिकार्यक्रमाचा विद्यार्थ्यांच्या गुणाच्या मध्यमानावर सकारात्मक परिणाम होतो.

शून्य परिकल्पना :

इंग्रजी संप्रेषण-कौशल्य विकसनासाठी स्वपरिचय, गटचर्चा, मुलाखत, व प्रश्नोत्तरे या साधनांसाठी कृतिकार्यक्रम राबविण्यापूर्वी व कृतिकार्यक्रम राबविल्यानंतर उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक दिसून येणार नाही.

संशोधनाची व्याप्ती :

१. पुणे जिल्ह्यातील मराठी माध्यमाच्या उच्च प्राथमिक स्तरावर शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना हे संशोधन उपयुक्त ठरणारे आहे.
२. इंग्रजी संप्रेषण कौशल्य विकसनासाठी हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

संशोधनाची मर्यादा :

संशोधनाचे निष्कर्ष हे पुढील घटकांमुळे मर्यादित होणार आहेत.

१. विद्यार्थ्यांना स्वतःसाठी अध्ययन करणेसाठी मिळालेला वेळ.
२. विद्यार्थ्यांच्या पालकांचा शैक्षणिक, आर्थिक स्तर.
३. विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी मिळालेले अनुकूल वातावरण.

संशोधनाची परिमर्यादा :

१. प्रस्तुत संशोधन हवेली तालुक्यातील उच्च प्राथमिक शिक्षण देणाऱ्या १० खाजगी व्यवस्थापनाच्या शाळा व महानगरपालिका क्षेत्रातील उच्च प्राथमिक शिक्षण देणाऱ्या १० खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांतील उच्च प्राथमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन संप्रेषण कौशल्यामधील Loud Reading, Look and Say, Echo Diaologue, Answering Questions, Say a word to complete the sentence, Just Repeat, Tell the English word you know, Describing a Picture, Group Discussion आणि Delivering a Speech या घटकांच्या परिणामांपुरतेच मर्यादित आहे.

संशोधन पद्धती व चले

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनात संशोधनाच्या पद्धतीपैकी सर्वेक्षण संशोधन पद्धती व प्रायोगिक संशोधन पद्धती अशा मिश्र संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

चले :

१. नियंत्रीत चल :

प्रस्तुत संशोधनात इयत्ता ८ वी तील विद्यार्थ्यांचे वय, लिंग, बौद्धिक क्षमता व पात्रता हे नियंत्रीत चल आहेत.

२. स्वाश्रयी चल :

विद्यार्थ्यांचे इंग्रजी संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी तयार केलेला कृतिकार्यक्रम हे प्रस्तुत संशोधनाचे स्वाश्रयी चल आहे.

३. आश्रयी चल :

प्रस्तुत संशोधनात इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांचा तयार केलेल्या कृतिकार्य्रकम राबविल्यानंतर इंग्रजी संप्रेषण कौशल्याचा होणारा विकास हे आश्रयी चल आहे.

संशोधनाची जनसंख्या आणि न्यादर्श निवड पद्धती :

जनसंख्या :

पुणे जिल्ह्यातील मराठी माध्यमाच्या उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ८ वी मध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी ही संशोधनाची जनसंख्या आहे.

न्यादर्श :

प्रस्तुत संशोधानात हवेली तालुक्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या १० शाळांमध्ये इयत्ता ८ वी च्या वर्गात शिक्षण घेणारे विद्यार्थी व महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी व्यवस्थापनाच्या १० शाळांमधील इयत्ता ८ वीच्या वर्गात शिक्षण घेणारे विद्यार्थी हे संशोधनाचा न्यादर्श आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी वर नमूद केलेल्या प्रत्येक शाळेतील एका वर्गातील विद्यार्थ्यांची निवड यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड केली जाणार आहे.

संशोधन अभिकल्प

संशोधनकार्यात करावयाच्या कृतीचे पद्धतशीर विवरण किंवा कृतीची मांडणी म्हणजे अभिकल्प होय.

प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेला अभिकल्प

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने एकलगट अभिकल्पाची निवड करण्याचे निश्चित केले आहे. या अभिकल्पामध्ये संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी इयत्ता आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना पूर्व चाचणी देऊन त्यानंतर संभाषण कौशल्यातील अडचणींचा शोध घेऊन व कृतीकार्यक्रम राबवून उत्तर चाचणी घेण्याचे निश्चित केले. पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यांच्या निरीक्षणाची तुलना करून परीक्षण करण्याचे निश्चित करण्याचे ठरविले.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक कार्यात्मक अभिकल्पाची निवड करणार आहे. कारण या प्रकारच्या अभिकल्पात प्रयोगासाठी फक्त एकलगट निवडला जाणार आहे. या गटाला एकच चाचणी किंवा समान चाचणी दोन भिन्न प्रसंगी दिली जाणार आहे व त्यातील गुणांच्या फरकावरून प्रायोगिक उपयोगाबाबत निष्कर्ष काढले जाणार आहेत. या अभिकल्पात प्रायोगिक गट व नियंत्रित गट असे दोन गट नसतात. एकाच गटाला दोन भिन्न प्रक्रियेतून जावे लागते.

एकलगट अभिकल्प



माहिती संकलनाची साधनेः

१. प्रश्नावली (शिक्षकांसाठी)

२. पूर्व चाचणी (विद्यार्थ्यांसाठी)

३. उत्तर चाचणी (विद्यार्थ्यांसाठी)

माहिती विश्लेषणाची साधने :

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माहिती विश्लेषणासाठी खालील संख्याशास्त्रीय तंत्राचा उपयोग केला जाणार आहे.

१. मध्यमान

२. प्रमाण विचलन

३. ‘t’ परिक्षिका

संशोधन कार्यपद्धती

इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांचे इंग्रजी संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी विषयतज्ज्ञ, मार्गदर्शकांशी चर्चा करून उपक्रमांची, कृती कार्यक्रमांची निर्मिती करणार आहे. कृतिकार्यक्रमांतर्गत संप्रेषण कौशल्याचे निकष विकसित करण्यासाठी पुढीलप्रमाणे कृतिकार्यक्रम राबविणार आहे.

Criteria & Activity

S.No.	Criteria	Activity
1	Content	Picture reading, Look & say, Describing a picture, Say a word to complete the sentences
2	Pronunciation	Loud Reading, Echo dialogues, Group Discussion, Say a word to complete the sentences
3	Grammar	Content, Answering Question, Delivering a speech, Echo dialogues
4	Body Language	Group Discussion, Look and say, Delivering a speech, Loud reading, Echo dialogues
5	Facial Expression/ Co-ordination between students	Delivering a speech, Group Discussion

संशोधन वेळापत्रक

अ.क्र.	उपघटक	कालावधी
१	समस्या निश्चिती	१ महिना
२	संदर्भ साहित्याचा आढावा	१५ दिवस
३	संशोधन आराखडा व सादरीकरण	१ महिना
४	शाळेस भेट व परवानगी	१५ दिवस
५	पथदर्शी अभ्यास, पूर्व चाचणी बनविणे.	१५ दिवस
६	कृतिकार्यक्रम निर्मिती	२ महिने
७	कृतिकार्यक्रम अंमलबजावणी	३ महिने
८	उत्तर चाचणी	५ दिवस
९	संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन	७ महिने
१०	निष्कर्ष व शिफारशी	२ महिने
११	अहवाल लेखन	६ महिने
	एकूण कालावधी	**२४ महिने**

खर्चाचे अंदाजपत्रक

अ.क्र.	तपशील	अंदाजे
१	आराखडा व कच्चे काम	५,०००
२	शाळा भेट	१०,०००
३	चाचणी, प्रश्नावली / झेरॉक्स खर्च	५,०००
४	संदर्भ पुस्तके खरेदी	५,०००
५	स्टेशनरी खर्च	२,०००
६	कार्यक्रम निर्मिती	१०,०००
७	संगणकीय टंकलेखन व बांधणी खर्च	१०,०००
८	प्रवास व इतर किरकोळ खर्च	३,०००
	एकूण खर्च	**५०,०००**

प्रकरणीकरण

अ.क्र.	**प्रकरण मांडणी**	**तपशील**
१	प्रकरण पहिले	प्रस्तावना
२	प्रकरण दुसरे	संबंधित संशोधन साहित्याचा आढावा
३	प्रकरण तिसरे	संशोधनाची कार्यपद्धती
४	प्रकरण चौथे	माहितीचे संकलन, वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन
५	प्रकरण पाचवे	सारांश, निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसूची

अ. इंग्रजी संदर्भसूची :

1. Best,J.w. and J.V.Kahn, (2009), Research in Education, (9th ed,) New Delhi : Prentice Hall of India pvt.
2. Mouloy, G.J.(1964), The Education Research, New Delhi : Eurasia publication.
3. Whitney, F. L. (1954), The Elements of Research, Prantice Hall Inc.
4. Wren and Martin, (2005), High School English Grammar and Composition. New Delhi : S. Chand Prakashan.

ब. मराठी संदर्भसूची :

१. भिताडे, वि. रा., (२००६), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नित्य नुतन प्रकाशन.

२. दांडेकर, वा. ना.,(२००४), शैक्षणिक संख्याशास्त्र व मुल्यमापन, पुणे : निलकंठ प्रकाशन.

३. घोरमोडे, (२००९), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : इनसाईट प्रकाशन

४. जगताप, ह. ना., (२००७), अध्यापन उपपत्ती व मूल्यमापन, पुणे : नुतन प्रकाशन.

५. मराठे, ए. जी., (२००५), कृति संशोधन पद्धती, पुणे : नुतन प्रकाशन.

६. म्हस्के टी. ए., (२००७), शैक्षणिक संख्याशास्त्र, नाशिक : इनसाईट प्रकाशन.

७. पंडीत, ब. बि., (२००७), शिक्षणातील संशोधन, पुणे : नित्य नुतन प्रकाशन.

८. शुक्ल, विद्याधर, (२००५), शैक्षणिक मूल्यमापन, पुणे : निराली प्रकाशन.

मासिके :

१. तापकीर, प्रतिक्षा, (ऑगस्ट २००४), भाषण कौशल्य, पुणे : जीवन शिक्षण.

२. देशपांडे, अंजली, (जुलै २००९), भाषण कॅफे, सत्याग्रही, विचारधारा, पुणे.

३. कुंभार, आर. ए., (फेब्रुवारी १९९६), भारतीय शिक्षण, Teaching English to secondary classes.

४. रोकडे, पी. आर, (नोव्हेबर२००७), संशोधन आराखडा शिक्षण समीक्षा, पुणे.

संशोधक विद्यार्थी नाव व सही	मार्गदर्शक नाव व सही
काळखैरे अंकुश नामदेव	डॉ. पुंडगे मधुकर अंबाजी